सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रैंकिंग 2019' मानांकन प्राप्त

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नॅक मानांकित 'अ' श्रेणी

'ज्ञानगंगोत्री',गोवर्धन,गंगापूर धरणाजवळ,नाशिक 422 222

वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा

बी.कॉम. शिक्षणक्रम (UGG02)-नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार

शैक्षणिक वर्ष
२०२५-२६

बी. कॉम. शिक्षणक्रम : माहितीपुस्तिका

शिक्षणक्रम संकेतांक (Programme Code): UGG02

अनुक्रमणिका

१. **विद्याशाखेचा परिचय**
   उद्धीष्ट
२. **शिक्षणक्रमाविषयी**
   २.१ कालावधी
   २.२ माध्यम
   २.३ बहुपदवी प्रवेश व एक्झिट प्रणाली
   २.३.१ प्रवेश बिंदू
   २.३.२ एक्झिट पर्याय
   २.३.३ पुनःप्रवेश / लेटरल एंट्री
३. **प्रथम वर्ष बी.कॉम**
   ३.१ अभ्यासक्रम
   ३२ अध्ययन पद्धती
   ३.३ श्रेयांक
   ३.४ प्रवेश पात्रता
४. मूल्यमापन प्रक्रिया
५. शिक्षणक्रम शुल्क
५.१ प्रथम वर्ष शुल्क
६.Academic Bank of Credits ID तयार करण्याबाबतची सूचना
७.नोंदणी प्रक्रिया
८.सायबर सुरक्षा अभ्यासक्रम (अनिवार्य ऑडीट कोर्स)
९. IBM **Certificate pogramme in Generative AI & Prompt Engineering**
१०. विभागीय केंद्रे
११. विशेष सूचना/संपर्कासाठी

परिशिष्टे

परिशिष्ट १ : Online Admission Process flow for Candidate NOT having 16 Digit P.R.N.
Online Admission Process flow for Candidate who have 16 Digit PR.N.
परिशिष्ट २ : उमेदवार/अध्ययनार्थी करारनामा/ Candidate/Student Agreement at the time of Admission
परिशिष्ट ३ : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली
परिशिष्ट ४ : University Grants Commission Resolution (2004)
परिशिष्ट ५ : GR. of Equivalency for 10th and 12th
परिशिष्ट ६ : एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश
परिशिष्ट ७ : GR of Equivalency
परिशिष्ट ८ : Letter of Recognition from UGC
परिशिष्ट ९ : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना
परिशिष्ट १० : Student Corner

विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञाना ची साधना।
चिरंतन ज्ञाना ची साधना।
ज्ञान हेच संजीवन सार्या जगताच्या जीवना॥धृ॥
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी।
तीच निवारील पटलतमाचे प्रभात सूर्यापरी।
ज्ञानचदेउळ, ज्ञानचदैवत, प्रगतीच्या पूजना॥ 1॥
नव्यायुगाचा नव्याजगाचा ज्ञानधर्म आहे।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे।
मुक्तकरिलतो परंपरेच्या बंदिघरातुन मना॥ 2 ॥
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे।
जेजे मंगल पावन त्याची जेथे आराधना॥ 3 ॥

कुसुमाग्रज

निर्मिती
श्री. विलास बधान
प्रमुख (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

©२०२५ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
- प्रथम प्रकाशन : जून २०२५
- प्रकाशक : श्री. दिलीप भरड, कुलसचिव , यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ , नाशिक

१. विद्याशाखेचा परिचय

मुक्त विद्यापीठाच्या स्थापनेपासून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यशस्वीरित्या कार्यरतआहे. सध्या विद्याशाखेत तीन पदवी शिक्षणक्रम, तीन पदविका शिक्षणक्रम आणि दोन पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम एम. कॉम व एम.बी.ए राबविले जातात.

उद्दिष्टे

- वाणिज्य क्षेत्रात विद्यार्थ्यांना कुशलतेचे शिक्षण व प्रशिक्षण देणे.
- वाणिज्य क्षेत्रासाठी उपयुक्त मानवी संसाधन तयार करणे.
- बहुकौशल्य विकासाचे शिक्षण देणे.
- भारतीय मूल्ये व संस्कार विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.
- विविध उद्योग आणि सेवा क्षेत्रात वाणिज्यतज्ज्ञांची गरज पूर्ण करणे.
- विद्यार्थ्यांच्या विशेष क्षमतांचा विकास करणे.
- विद्यार्थ्यांना बहुविषयक आणि सर्वांगीण शिक्षण देणे.
- विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व अशैक्षणिक सर्वांगीण विकास घडवून आणणे.
- वाणिज्य विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास गुण वृद्धिंगत करणे .
- विद्यार्थ्यांची रोजगारक्षमतेची कौशल्ये वाढवणे.
- विद्यार्थ्यांची निर्णय घेण्याची क्षमता वाढवणे.
- व्यवस्थापक होऊ इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे.
- समृद्ध जीवन जगण्यासाठी ज्ञानात्मक आधार देणे.

२. शिक्षणक्रमाविषयी

२.१ शिक्षणक्रमाचा कालावधी

शिक्षणक्रमाचा किमान कालावधी **तीन** वर्षे आहे, तसेच विद्यार्थी हा शिक्षणक्रम **सहा** वर्षांच्या कालावधीत पूर्ण करू शकतो .

२.२ माध्यम

इंग्रजी,तसेच Accounting and FinancialManagement अभ्यासक्रमाखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठी माध्यम राहील. इंग्रजी तसेच Accounting and FinancialManagement खेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके , अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन , गृहपाठ व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी मराठी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

२.४ बहुपदवी प्रवेश व एक्झिट प्रणाली

बी.कॉम. शिक्षणक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक गरजांनुसार वेगवेगळ्या टप्प्यांवर प्रवेश आणि एक्झिट घेता येतील , अशा लवचीक पद्धतीने तयार करण्यात आला आहे. प्रत्येक सत्र २२ श्रेयांकाचे आहे. शिक्षणक्रमाची रचना पुढीलप्रमाणे आहे:

२.४.१ प्रवेश बिंदू:

i. विद्यार्थ्यांनी प्रवेश पात्रतेनुसार पात्र ठरल्यानंतर सामान्यतः पहिल्या वर्षातील पहिल्या सत्रात (१ वर्ष) प्रवेश घेतला जातो.

ii. विशेष प्रकरणांमध्ये (उदा. लेटरल एंट्री किंवा मान्यताप्राप्त संस्थेमधून क्रेडिट ट्रान्सफर) पात्रता व श्रेयांक समतुल्यता विचारात घेऊन विद्यार्थ्यांना पुढील टप्प्यांवर प्रवेश दिला जाऊ शकतो .

२.४.२ एक्झिट पर्याय:

i. १ वर्षानंतर (२ सत्रे / ४४ क्रेडिट्स): अतिरिक्त ४ क्रेडिटचे एनएसक्यूएफ कोर अभ्यासक्रम/इंटर्नशिप पूर्ण करून वाणिज्य विषयात प्रमाणपत्रासह एक्झिट.

ii. **२ वर्षानंतर (४ सत्रे / ८८ क्रेडिट्स):** अतिरिक्त ४ क्रेडिटचे एनएसक्यूएफ कोर अभ्यासक्रम/इंटर्नशिप पूर्ण करून वाणिज्य विषयात डिप्लोमासह एक्झिट.

iii. ३ वर्षानंतर (६ सत्रे / १३२ क्रेडिट्स): बी.कॉम. पदवी प्रदान केली जाईल.

२.४.३ पुनःप्रवेश / लेटरल एंट्री :

कोणत्याही टप्प्यावर एक्झिट घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन वर्षांच्या आत , त्यांनी सोडलेल्या टप्प्यापासूनच परत प्रवेश घेण्याचा पर्याय उपलब्ध आहे. हा प्रवेश त्याच किंवा इतर उच्च शिक्षण संस्थेमध्ये घेता येईल आणि एकूण सात वर्षांच्या कालावधीत पदवी पूर्ण करता येईल (प्रथम वर्ष UG प्रवेश दिनांकापासून मोजले जाईल).शैक्षणिक कार्यक्रमातील वेगवेगळ्या टप्प्यांवर पुनःप्रवेश (लेटरल एंट्री) मिळविणे हे अर्जदाराच्या अर्जित आणि वैध क्रेडिट्सवर आधारित असेल , जे रजिस्टर्ड उच्च शिक्षण संस्थांमार्फत अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स (ABC) मध्ये जमा केले गेलेले असतील आणि प्राविण्य चाचणी नोंदींच्या आधारे असेल.लेटरल एंट्रीद्वारे UG डिप्लोमा / तीन वर्षांची UG पदवी शिक्षणक्रमास प्रवेश देताना अर्जदाराने या आधी मिळविलेल्या श्रेयांक आणि प्रवेश क्षमतेच्या आधारे निर्णय घे तला जाईल.

- बी. कॉम. पदवी शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांची मांडणी पुढील तीन गटांत करण्यात आली आहे .

३.Level 4.5 प्रथम वर्ष - प्रथम सत्र

Major

Sr. No.	Course Code	Course Name		Credit	Marks
01	COMC101	Accounting and Financial Management – I	Major	4	100
02	COMC102	व्यवसायाचा परिचय	Major	2	50

Open Elective

Select any two open elective courses from basket					
BA-इतिहास पदवी शिक्षणक्रम (मानवविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा)					
	HISE101	आधुनिक इतिहासातील राजकीय आणि धार्मिक संकल्पना	OE	2	50
	HISE102	आधुनिक इतिहासातील सामाजिक आणि आर्थिक संकल्पना	OE	2	50
	OR				
	BA-लोकप्रशास पदवी शिक्षणक्रम (मानवविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा)				

	PADE101	शिवकालीन प्रशासन	OE	2	50
	PADE102	भारतीय प्रशासन	OE	2	50
	OR				
	Discipline: (School of Computer Science)				
3	CMPE001	Digital Literacy and Cyber Hygiene	OE	2	50
4	CMPE002	Python for Beginners	OE	2	50
	OR				
	Discipline: (School of Science)				
3	PHYE101	Physics of Daily Life	OE	2	50
4	PHYE102	Materials in Daily Life	OE	2	50
	OR				
3	CHEE101	Chemistry in Everyday Life	OE	2	50
4	CHEE102	Industrial Safety Management	OE	2	50
	OR				
3	MATE101	Mathematics for Competitive Exam-I	OE	2	50
4	MATE102	Logical Reasoning and Data Interpretation	OE	2	50
	OR				
3	BOTE101	Bio fertilizers	OE	2	50
4	BOTE102	Mushroom Culture Technology	OE	2	50
	OR				
3	ZOOE101	Vermicomposting Management	OE	2	50
4	ZOOE102	Sericulture Management	OE	2	50
	OR				
3	EVSE101	Biodiversity of India	OE	2	50
4	EVSE102	Futuristic Approach for Smart City	OE	2	50

Compulsory

05	COMV103	आर्थिक साक्षरता – I	VSC	2	50
06	COMS104	कार्यालयीन व्यवस्थापन – I	SEC	2	50
07	VCED101	भारतीय संविधानाची ओळख	VEC	2	50
08	AECL101	Listening and Speaking Skills	AEC	2	50

	Select any one IKS course from Basket				
09	IKSK101	भारतीय ज्ञान परंपरेतील कला आणि प्राचीन भाषा	IKS	2	50
09	IKSK102	भारतीय ज्ञान परंपरा: सामाजिकशास्त्रे	IKS	2	50
09	IKSK103	भारतीय ज्ञान परंपरा: आरोग्यशास्त्र	IKS	2	50
09	IKSK104	भारतीय ज्ञान परंपरेच्या अनुषंगाने विज्ञान आणि तंत्रज्ञान	IKS	2	50
09	IKSK105	भारतीय ज्ञान प्रणाली : सामान्य **(ऑनलाईन)**	IKS	2	50
	Select any one from Basket				
10	CCRX101	आरोग्य आणि निरोगी जीवन-I	CC	2	50
	CCRX102	योग शिक्षण –I	CC	2	50
	CCRX103	खेळ आणि शारीरिक क्षमता –I	CC	2	50
	CCRX104	सांस्कृतिक कृती-I	CC	2	50
	CCRX105	समाजसेवा-I	CC	2	50
	CCRX106	ललित/उपयोजित/दृश /सादरीकरण कला-I	CC	2	50
	Total Credit			**22**	**550**

(Major, OE-Open Elective Courses, VSC- Vocational Skill Courses, SEC- Skill Enhancement Courses, VEC- Value Education Courses, AEC- Ability Enhancement Courses, IKS- Indian Knowledge System and CC- Co-curriculum Courses)

Semester II

3.1Major/Minor (Compulsory)

Sr No	Course Code	Course Name		Credit	Marks
1	COMC106	Accounting and Financial Management – II	Major	4	100
2	COMC107	उद्योजकता आणि व्यवसाय विकास	Major	2	50
3	COMM108	व्यावसायिक अर्थशास्त्राची मुलतत्वे	Minor	2	50

Open Elective

	Select any two open elective courses from basket				
	BA-इतिहास पदवी शिक्षणक्रम (मानवविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा)				
	HISE103	भारतातील प्रबोधन चळवळ	OE	2	50
	HISE104	भारतातील समाजसुधारणेचा विचार आणि फलश्रुती	OE	2	50
	BA-लोकप्रशास पदवी शिक्षणक्रम (मानवविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा)				
	PADE103	भारतातील सनदी सेवा	OE	2	50
	PADE104	भारतातील प्रमुख संविधानिक आणि वैधानिक आयोग	OE	2	50
		Discipline:(School of Computer Science)			
04	CMPE003	Artificial Intelligence and Society	OE	2	50

05	CMPE004	Introduction to Data Analytics with Excel and Google Sheets	OE	2	50
		OR			
	Discipline: (School of Science)				
4	PHYE103	Renewable Energy for Daily Life	OE	2	50
5	PHYE104	Energy Audit	OE	2	50
	OR				
4	CHEE103	Pesticides Chemistry	OE	2	50
5	CHEE104	Food Safety Adulteration & Detection	OE	2	50
	OR				
4	MATE103	Mathematics for Competitive Exam-II	OE	2	50
5	MATE104	Statistics for Research	OE	2	50
	OR				
4	BOTE103	Nursery and Gardening	OE	2	50
5	BOTE104	Floriculture	OE	2	50
	OR				
4	ZOOE103	Poultry Management	OE	2	50
5	ZOOE104	Goat Farming	OE	2	50
	OR				
4	EVSE103	Environmental Economics	OE	2	50
5	EVSE104	Ecotourism	OE	2	50

(Compulsory)

06	COMV109	आर्थिक साक्षरता – II	VSC	2	50
07	COMS110	कार्यालयीन व्यवस्थापन – II	SEC	2	50
08	AECL102	Reading and Writing Skills	AEC	2	50
09	VECD102	पर्यावरण शिक्षण	VEC	2	50
	Select any one from Basket				
10	CCRX107	आरोग्य आणि निरोगी जीवन-II	CC	2	50
10	CCRX108	योग शिक्षण –II	CC	2	50
10	CCRX109	खेळ आणि शारीरिक क्षमता –II	CC	2	50
10	CCRX110	सांस्कृतिक कृती-II	CC	2	50
10	CCRX111	समाजसेवा-II	CC	2	50
10	CCRX112	ललित/उपयोजित/दृश /सादरीकरण कला-II	CC	2	50
	Total Credit			**22**	**550**

(Major, Minor, OE-Open Elective Courses, VSC- Vocational Skill Courses, SEC- Skill Enhancement Courses, AEC-Ability Enhancement Courses, VEC- Value Education Courses, and CC- Co-curriculum Courses)

Exist Option: Exit Option Award of UG Certificate in Major & minor of Commerce with 44 Credit & and 4 Credit core NSQF course/Internship with Certificate.

Second Year B.COM

4. Level 5.0 Semesters III

Major/Minor (Compulsory)

Sr. No.	Course Code	Course Name		Credit	Marks
01	COMC201	Accounting and Financial Management III	Major	4	100
02	COMC202	भारतातील पारंपारिक व्यवसाय पद्धती	Major	4	100
03	COMM203	व्यावसायिक अर्थशास्त्र –I	Minor	4	100

Open Elective

Select any one open elective courses from basket					
BA-इतिहास पदवी शिक्षणक्रम (मानवविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा)					
	HISE201	महाराष्ट्राची परिकल्पना	OE	2	50
	OR				
BA-लोकप्रशास पदवी शिक्षणक्रम (मानवविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा)					
	PADE201	मानवी हक्क प्रशासन	OE	2	50
		OR			
	Discipline: (School of Computer Science)				
04	CMPE005	Web Tools for Digital Communication	OE	2	50
	OR				
Discipline: (School of Science)					
04	PHYE201	Physics of Sound &Music	OE	2	50
	OR				
04	CHEE201	Fuel Chemistry	OE	2	50
	OR				
04	MATE201	Mathematics for Finance	OE	2	50
	OR				
04	BOTE201	Herbal Drug Technology	OE	2	50
	OR				
04	ZOOE201	Dairy Production & Management	OE	2	50
	OR				
04	EVSE201	Sustainable Development Goal &Society	OE	2	50

(Compulsory)

05	COMV204	पर्यटन व्यवस्थापन	VSC	2	50
06	AECL201 OR AECL203	(Select Any ONE) श्रवण आणि संभाषण कौशल्य (मराठी) OR श्रवण और संभाषण कौशल (हिंदी)	AEC	2	50
07	COMF205	क्षेत्रीय प्रकल्प	FP	2	50

	Select any one from Basket				
	CCRX201	आरोग्य आणि निरोगी जीवन-III	CC	2	50
	CCRX202	योग शिक्षण –III	CC	2	50
	CCRX203	खेळ आणि शारीरिक क्षमता –III	CC	2	50
	CCRX204	सांस्कृतिक कृती-III	CC	2	50
	CCRX205	समाजसेवा-III	CC	2	50
	CCRX206	ललित/उपयोजित/दृश /सादरीकरण कला-III	CC	2	50
	Total Credit			**22**	**550**

(Major, Minor, OE- Open Elective Courses, VSC- Vocational Skill Courses, AEC-Ability Enhancement Courses, FP- Field Project, CC- Co-curriculum Courses)

4.1 Semester IV

Sr. No.	Course Code	Course Name		Credit	Marks
01	COMC207	Accounting and Financial Management –IV	Major	4	100
02	COMC208	व्यवस्थापनाचे कार्य	Major	4	100
03	COMM209	व्यावसायिक अर्थशास्त्र –II	Minor	4	100

Select any one open elective courses from basket					
BA-इतिहास पदवी शिक्षणक्रम (मानवविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा)					
04	HISE202	छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचा काळ	OE	2	50
BA-लोकप्रशास पदवी शिक्षणक्रम (मानवविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा)					
04	PADE202	माहितीचा अधिकार: स्वरूप आणि कार्यपद्धती	OE	2	50
		Discipline: (School of Computer Science)			
04	CMPE006 OR CMPE007	Introduction to Digital Marketing and Analytics **OR** Work Life Balance	OE	2	50
	OR				
Discipline: (School of Science)					
04	PHYE202	Physician Sports	OE	2	50
	OR				
04	CHEE202	Chemistry of Cosmetics	OE	2	50
	OR				
04	MATE202	Basics of Actuarial Science			
	OR				
04	BOTE202	Sustainable Agriculture	OE	2	50
	OR				

04	ZOOE202	Nutrition, Health and Hygiene	OE	2	50
		OR			
		Discipline: Environmental Science(School of Science)			
04	EVSE202	Environmental Law	OE	2	50

05	COMV210	मॉल व्यवस्थापन	VSC	2	50
06	AECL202 OR AECL204	वाचन आणि लेखन कौशल्ये (मराठी) OR पठन और लेखन कौशल	AEC	2	50
07	COMF211	क्षेत्रीय प्रकल्प	FP	2	50
08	**Select any one from Basket**				
	CCRX207	आरोग्य आणि निरोगी जीवन-IV	CC	2	50
	CCRX208	योग शिक्षण –IV	CC	2	50
	CCRX209	खेळ आणि शारीरिक क्षमता –IV	CC	2	50
	CCRX210	सांस्कृतिक कृती-IV	CC	2	50
	CCRX211	समाजसेवा-IV	CC	2	50
	CCRX212	ललित/उपयोजित/दृश /सादरीकरण कला-IV	CC	2	50
	Total Credit			**22**	**550**

Exist Option: Exit option Award of UG diploma in Major & Minor of Commerce with 88 Credits and an additional 4credit core NSQF course/Internship with Certificate

(Major, Minor, OE- Open Elective Courses, VSC- Vocational Skill Courses, AEC-Ability Enhancement Courses, FP- Field Project, CC- Co-curriculum Courses)

Third Year B.COM

5.1 Level 5.5 Semester V

Sr. No.	Course Code	Course Name		Credit	Marks
01	COMC301	Accounting and Financial Management – V	Major	4	100
02	COMC302	व्यवस्थापन:उत्पादन आणि वित्त	Major	4	100
03	COMC303	मूल्य शिक्षण	Major	2	50
04	COME304 OR COME305	**Select Any one** Cost Accounting-I **OR** निर्यात विपणन-I	**Elective**	4	100
05	COMM306	व्यावसायिक अर्थशास्त्र -*III*	Minor	4	100
06	COMV307	डीजीटल मार्केटिंग	VSC	2	50

07	COMF308	क्षेत्रीय प्रकल्प	FP	2	50
	Total			22	550

(Major, Minor, E- Elective Courses, VSC- Vocational Skill Courses, FP- Field Project)

Semester VI

Sr. No.	Course Code	Course Name		Credit	Marks
01	COMC309	Accounting and Financial Management –VI	Major	4	100
02	COMC310	संघटनात्मक वर्तन	Major	4	100
03	COMC311	सायबर सुरक्षा	Major	2	50
04	COME312 OR COME313	**Select Any one (Elective)** Cost Accounting-II **OR** निर्यात विपणन -II	Elective	4	100
05	COMM314	व्यावसायिक अर्थशास्त्र -IV	Minor		100
06	COMO315	OJT/Internship	OJT	4	100
	Total			22	550

Exist Option: Awarded UG Degree of B.COM of 132 credits
(Major, Elective, Minor, OJT-On Job Training)

महत्वाच्या सूचना:

1. Open Elective अभ्यासक्रम हे आंतर विद्याशाखीय अभ्यासक्रम आहेत , जे विद्यार्थ्यां ना उपलब्ध करून दिलेल्या Basket मधून निवडणे आवश्यक आहे. Open Elective अभ्यासक्र माची सर्व पाठ्यपुस्तके फक्त ई-बुक स्वरुपात विद्यार्थ्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील.
2. सह-पाठ्यक्रम अभ्यासक्रम (Co-curriculum courses - CC), क्षेत्रीय प्रकल्प (Field Project - FP) आणि ऑन-जॉब ट्रेनिंग (On Job Training - OJT) यासंबंधीचे सविस्तर मार्गदर्शक त त्वे विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी हे मार्गदर्शक त त्वे आणि अन्य सूचना वेळोवेळी पाहण्यासाठी संकेतस्थळ नियमितपणे तपासावे.
3. प्रथम वर्ष , व दुसरे वर्ष पूर्ण केल्यानंतर एक्झिट घेतल्यास , कॉमर्स प्रमाणपत्र , किंवा डिप्लोमा प्रमाणपत्र घे ण्यासाठी विद्यापीठाच्या नियमांनुसार अतिरिक्त नाममात्र शुल्क लागू हो तील.
4. प्रत्येक सत्रामध्ये विद्यार्थीसाठी उपलब्ध असलेल्या ओपन इलेक्टिव्ह (OE) अभ्यासक्रमांच्या समूहामधून कोणताही एक अभ्यासक्रम निवडू शकतो .
5. विद्यार्थ्यां ने जर एका सत्रामध्ये मराठी किंवा हिंदी या अभ्यासक्रमापैकी जो ॲबिलिटी एन्हान्समेंट कोर्स (Ability Enhancement Courses) निवड ला असेल तर पुढील सत्रामध्ये तोच अभ्यासक्रम निवडावा.

५.२ अध्ययन पद्धती

ज्या विद्यार्थ्यांना दररोज महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेता येत नाही ; तसेच अध्ययन करण्यासाठी

पूर्ण वेळ देता येत नाही , अशा विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाने स्वतंत्रपणे अध्ययन पद्धती विकसित केली आहे. त्यात पुढील घटकांचा समावेश आहे.

- स्वयं-अध्ययनाधिष्ठित पाठ्यपुस्तके.
- तज्ज्ञ प्राध्यापकांचे संपर्कसत्रात मार्गदर्शन.
- अध्ययन कालांतर्गत मूल्यमापनाची सोय.
- आवश्यक तेथे प्रात्यक्षिकांची संधी.
- आभासी वर्ग (Virtual Class Room)

या अध्ययन पद्धतीत विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचा तपशील न देता , त्यावरील अध्ययन साहित्य विद्यापीठाच्या www. ycmou.digitaluniversity.ac तसेच www.ycmou.ac.in या संकेतस्थळावर pdf स्वरूपात उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी याचा वापर करावा तसेच विद्यार्थ्यांना पुस्तकांचा संचही देण्यात येतो. प्रवेश शुल्कातच ही अध्ययन पुस्तके देण्यात येतात व ती विद्यार्थ्याला स्वतःकडे कायम ठेवता येतात. ही स्वयं-अध्ययन पुस्तके अन्य पाठ्यपुस्तकांपेक्षा निराळ्या पद्धतीने लिहिलेली असतात. ह्या पाठ्यपुस्तकात एका वाचनात समजावून घेता येईल अशा प्रकारे विषयांची छोट्या छोट्या घटकांत विभागणी केलेली असते. उदाहरणार्थ , आलेख ,उदाहरणे , चित्रे, इत्यादींच्या साहाय्याने विषयांची मांडणी सुबोधपणे करण्यात येते. ह्या पुस्तकांची छपाई विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभपणे व्हावे या दृष्टीने करण्यात आलेली असते. पाठ्यांशाखाली काही प्रश्न दिलेले असतात , तो तो भाग वाचून झाल्यावर हे प्रश्न विद्यार्थ्यान सोडविल्यास तो भाग आपल्याला कितपत समजला ह्याचा विद्यार्थ्याला स्वतःलाच पडताळा घेता येतो. जर विद्यार्थ्याला काही प्रश्न सोडविता आले नाहीत , तर विद्यार्थ्याने तो भाग पुन्हा वाचून उत्तरे मिळवावयाची असतात. एवढे करूनही काही प्रश्नांची उत्तरे मिळू शकले नाहीत तर ते प्रश्न नोंदवून ठेवावेत व अभ्यासकेंद्रावरील संपर्कसत्रात मार्गदर्शक प्राध्यापकांशी (संमंत्रक Counselor) चर्चा करून त्याची उत्तरे मिळविता येतात.

विद्यार्थ्याला आपल्या सोईच्या ठिकाणचे अभ्यासकेंद्र निवडता येते. या अभ्यासकेंद्रावर प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सामान्यतः सुटीच्या दिवशी संपर्कसत्रे घेण्यात येतात. त्या त्या विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक ह्या संपर्कसत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. मात्र हे मार्गदर्शन केवळ व्याख्यानांच्या स्वरूपाचे असत नाही. मार्गदर्शकाकडून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची / शंकांची उत्तरे मिळविणे , कठीण विषयावर चर्चा-परिसंवाद घडवून आणणे , अंतर्गत मूल्यमापनाच्या माध्यमांतून आपल्या प्रगतीविषयी विद्यार्थ्याला माहिती घेता येते. म्हणून संपर्कसत्रांना विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे.

विद्यार्थ्याने वरील सर्व अध्ययन सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन स्वतःची अभ्यासपद्धती तयार करावी. आपल्याला मिळणारा वेळ लक्षात घेऊन मिळणाऱ्या वेळेचा नियोजनपूर्वक उपयोग करावा. केवळ पाठांतराद्वारे केलेला अभ्यास हा खरा अभ्यास नसून विषयाचेसुस्पष्ट आकलन होणे व त्याचा योग्य ठिकाणी उपयोग करता येणे हे चांगल्या अभ्यासपद्धतीचे मर्म आहे. त्यामुळे प्रात्यक्षिके व सराव यांवर भर देऊन विद्यार्थ्याने अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे.

५.३ श्रेयांक

प्रत्येक अभ्यासक्रमास विशिष्ट **क्रेडिट गुणांचे मूल्य** दिले जाते. **क्रेडिट गुण** म्हणजे त्या विशिष्ट युनिटचा (पुस्तकातील किंवा अभ्यासक्रमातील) अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेला **अभ्यासाचा कालावधी** .

सामान्यतः, **१ क्रेडिट गुण = सुमारे ३० तासांच्या अध्ययनाशी समतुल्य** मानला जातो. हे अध्ययन तास म्हणजे — वाचन, टिपण लिहिणे , व्याख्याने ऐकणे , चर्चांमध्ये भाग घेणे , ऑडिओ ऐकणे, विशेष तयार केलेली व्हिडिओ क्लिप्स पाहणे इत्यादीसाठी लागणारा वेळ.

बॅचलर ऑफ कॉमर्स (B.Com) ही पदवी पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना एकूण १३२ क्रेडिट गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

५.४ प्रवेश पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती :

1. य.च.म.मुक्त विद्यापीठ पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण व 1 जुलै रोजी वय वर्षे 21 पूर्ण असणे आवश्यक आहे.
2. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता बारावी (एच.एस.सी.) किंवा इतर राज्यांतील 12 वी समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.
3. 1975 पूर्वीची माध्यमिक शालांत परीक्षा (11 वी) उत्तीर्ण.
4. एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर सलग किमान 2 वर्षे मुदतीचा सरकारमान्य पदविका शिक्षणक्रम उत्तीर्ण. उदाहरणार्थ , डी.सी.ई , डी.एम.ई. , डी.ई.ई. , डी. फार्म , डेअरी टेक. , टी.डी. , ए.टी.डी. , एन.सी.टी.व्ही.टी. , आय.टी.आय. , एम.सी.व्ही.सी.
5. AIU ने वेळोवेळी मान्यता दिलेल्या विविध boards च्या एच.एस.सी. किंवा समकक्ष पदवी प्राप्त असलेले सर्व विद्यार्थी.

विशेष सूचना

(1) प्रवेश-अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे अत्यंत आवश्यक आहे.

- शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित सत्यप्रत (Attestedphoto copy)
- शैक्षणिक पात्रतेबाबतच्या (Attested photo copy) गुण-पत्रकांच्या प्रमाणित सत्यप्रती.

(2) विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत कोणत्याही प्रमाणपत्राची मूळ प्रत जोडू नये. जोडल्यास विद्यापीठ सदर प्रत/प्रती परत पाठविणार नाही व या संदर्भात पत्रव्यवहार केला जाणार नाही.

६. मूल्यमापन प्रक्रिया

६.१ मूल्यमापन नमुना

या अभ्यासक्रमाचे मूल्यांकन पुढीलप्रमाणे घटकांवर आधारित असते:

१०० गुणांच्या मुख्य सिद्धांत अभ्यासक्रमासाठी , मूल्यांकनात पुढीलप्रमाणे गुणांचे विभाजन असते —

- **अंतिम मूल्यमापन (सत्रअंतिम परीक्षा — EE): ७० गुण**
- **अंतर्गत मूल्यमापन (गृहपाठ — CA): ३० गुण**

अंतिम मूल्यमापन (End Examination) व अंतर्गत मूल्यमापन (Continuous Assessment) या दोन्ही घटकांमध्ये विद्यार्थ्यांनी किमान ४०% गुण मिळवणे आवश्यक आहे . गृहपाठामध्ये मिळवलेले गुण गुणपत्रकात स्वतंत्रपणे दर्शवले जातील .

(A) अंतर्गत मूल्यमापन (सतत मूल्यमापन - गृहपाठ): ३० गुण

विद्यापीठ आपल्या अधिकृत संकेतस्थळावर http://ycmou.digitaluniversity.ac गृहपाठाचे प्रश्न अपलोड करेल. विद्यार्थी ने हे प्रश्न संकेतस्थळावरून डाउनलोड करावेत.

विद्यार्थ्यांनी स्वहस्ताक्षरित गृहपाठ स्वच्छरित्या लिहून , सॉफ्ट कॉपी स्वरूपात विद्यापीठाच्या गृहपाठ सादर करण्याच्या पोर्टलवर विद्यापीठाने घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार सादर करावेत.

विद्यार्थ्यांनी नियमितपणे विद्यापीठाच्या सूचना व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे आणि आपले लर्नर सपोर्ट सेंटरशी संपर्कात राहून वेळेत गृहपाठ सादर करावेत . प्रत्येक अभ्यासक्रमासाठी गृहपाठ त्या शैक्षणिक वर्षाच्या सत्रातच निश्चित तारखांपूर्वी पूर्ण करणे अनिवार्य आहे.

प्रकल्प कार्य / प्रात्यक्षिक / मौखिक परीक्षा (Viva-Voce):

या घटकांचे मूल्यांकन प्रकल्प कार्य / प्रात्यक्षिक / मौखिक परीक्षा किंवा अभ्यासक्रमाच्या स्वरूपानुसार या सर्व घटकांच्या संयोजनावर आधारित असेल.

३.२ सत्र अंतिम परीक्षा (End Examination — EE): ७० गुण

शिकवणी कालावधी संपल्यानंतर घेण्यात येणारी परीक्षा म्हणजे अंतिम परीक्षा होय.

- **४ क्रेडिट अभ्यासक्रमासाठी — ७० गुण**
- **२ क्रेडिट अभ्यासक्रमासाठी — ३५ गुण**

विद्यापीठ ही परीक्षा **पूर्वनिश्चित वेळापत्रकानुसार** घेते. प्रत्येक अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांनी **किमान ४०% गुण मिळवणे आवश्यक** आहे.

मूल्यमापन नमुना

घटक (Components)	क्रेडिट्स ची संख्या (Number of Credits)	विद्यापीठ मूल्यांकन (University Assessment)	सतत मूल्यांकन (Continuous Assessment)	एकूण गुण (Total Marks)	उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक गुण (Passing Marks)
सिद्धांत (Theory)	4 श्रेयांक	70 गुण	30 गुण	100 गुण	विद्यापीठ मूल्यांकन व सतत मूल्यांकन यामध्ये स्वतंत्रपणे किमान 40% गुण मिळवणे आवश्यक आहे.
	2 श्रेयांक	35 गुण	15 गुण	50 गुण	
फील्ड प्रकल्प (Field Project/OJT)	4 श्रेयांक	50 गुण	50 गुण	100 गुण	
संशोधन प्रकल्प (Research Project)	4 श्रेयांक	50 गुण	50 गुण	100 गुण	

उत्तीर्ण होण्याचे निकष (Passing Criteria)

विद्यार्थ्याने प्रत्येक अभ्यासक्रमाच्या प्रत्येक घटकात **किमान ४०% गुण** मिळवणे आवश्यक आहे , तेव्हाच तो अभ्यासक्रम **उत्तीर्ण** मानला जाईल.

फील्ड प्रोजेक्टचे सविस्तर मूल्यांकन संरचना

घटक (Module)	युनिट (Unit)	गुणांचे वाटप टक्केवारीने (%)
१	समाजाची मूलभूत रचना , समस्या क्षेत्राची प्रमुख व्याख्या , प्राथमिक माहितीचे विश्लेषण	३०%
२	वर्गखोलीत केलेले कार्य , पत्रव्यवहार , फॉरमॅट्स , संवाद व समन्वय	१०%
३	फील्डवर केलेले काम व माहिती संकलन	३०%
४	विश्लेषण व अहवाल लेखन	२०%
५	समुदायास फीडबॅक देणे	१०%
एकूण		**१००%**

ओजेटी (On Job Training - OJT) चे सविस्तर मूल्यांकन संरचना

अनु.क्र.	घटक (Component)	गुणांचे वाटप टक्केवारीने (%)
१	प्रत्यक्ष काम/जबाबदाऱ्या	३०%
२	कामाचा अहवाल (Work Report)	३०%
३	उपस्थिती (Attendance): • ९०% किंवा अधिक: **२०%** • ७०% ते ८९%: **१५%** • ५०% ते ६९%: **१०%** ५०% पेक्षा कमी: **०%**	२०%
४	मौखिक परीक्षा (Viva Voce) |	२०%
	एकूण	१००%

विद्यार्थ्याचा अंतिम निकाल सर्व शैक्षणिक वर्षांतील अभ्यासक्रमातील गुणांचा विचार करून खालील आधारांवर जाहीर केला जाईल :

(A) क्रेडिट बेस्ड सेमेस्टर सिस्टम (CBSS): अभ्यासक्रमाच्या CBSS प्रणालीअंतर्गत पदवी, डिप्लोमा किंवा प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यकतेची अट विद्यार्थ्यांनी पूर्ण केलेल्या श्रेयांकाच्याच्या संख्येच्या आधारावर निश्चित केली जाते.

(B) क्रेडिट पॉइंट (Credit Point): ग्रेड पॉइंट व संबंधित अभ्यासक्रमाचे श्रेयांक यांच्या गुणाकारावर आधारित असते.

(C) क्रेडिट (Credit): क्रेडिट ही अभ्यासक्रम मोजण्याचे एकक आहे. यावरून प्रत्येक आठवड्यात किती तास शिकवणी लागेल हे ठरते. एका श्रेयांकासाठी सुमारे ३० तासांचे अध्ययन अपेक्षित असते.

(D) एकत्रित श्रेणी बिंदू सरासरी (Cumulative Grade Point Average – CGPA): CGPA हे विद्यार्थ्याच्या सर्व सेमिस्टरमधील एकत्रित शैक्षणिक कामगिरीचे प्रमाण दर्शवते.

ही सरासरी म्हणजे विद्यार्थ्याने सर्व अभ्यासक्रमांमध्ये मिळवलेले एकूण क्रेडिट पॉइंट्स आणि सर्व अभ्यासक्रमांचे एकूण श्रेयांक यांचे गुणोत्तर होय. CGPA दोन दशांशांपर्यंत (two decimal places) व्यक्त केला जातो.

(E) ग्रेड पॉइंट (Grade Point): प्रत्येक लेटर ग्रेडला १०-बिंदूंच्या (10-point) शृंखलेतील एक संख्यात्मक मूल्य (numerical weight) दिले जाते, त्यालाच ग्रेड पॉइंट म्हणतात.

(F) लेटर ग्रेड (Letter Grade): हे एखाद्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याच्या **कामगिरीचे निदर्शक** आहे. गुणांचे मूल्यांकन **O, A+, A, B+, B, C, P आणि F** या **अक्षरी ग्रेडच्या स्वरूपात** केले जाते. UGC कडून **१०-बिंदूंच्या ग्रेडिंग प्रणालीची शिफारस करण्यात** आलेली असून, त्यासाठी खालीलप्रमाणे **लेटर ग्रेड व त्यांचे ग्रेड पॉइंट्स** वापरले जातात.

100 पैकी मिळालेले गुण (Marks Obtained)	ग्रेड पॉइंट्स (Grade Points)	सेमेस्टर GPA / प्रोग्राम CGPA	टक्केवारी (%)	अक्षरी चिन्ह / ग्रेड (Letter Grade)
90 – 100	10	9.00 – 10.00	90.0 – 100	O (उत्कृष्ट- Outstanding)
80 – 89.99	9	8.00 – <9.00	80.0 – <90	A+ (उत्कृष्ट -Excellent)
70 – 79.99	8	7.00 – <8.00	70.0 – <80	A (खूप चांगले - Very Good)
60 – 69.99	7	6.00 – <7.00	60.0 – <70	B+ (चांगले - Good)
55 – 59.99	6	5.50 – <6.00	55.0 – <60	B (साधारण चांगले - Above Average)
50 – 54.99	5	5.00 – <5.50	50.0 – <55	C (सरासरी- Average)
40 – 49.99	4	4.00 – <5.00	40.0 – <50	P (पास - Pass)
0 – 39.99	0	खाली 4.00	40 पेक्षा कमी	F (नापास - Fail)
अनुपस्थित	—	—	—	AB (अनुपस्थित - Absent)

(G) सेमेस्टर ग्रेड पॉइंट सरासरी (SGPA):

SGPA म्हणजे एखाद्या सेमेस्टरमध्ये विद्यार्थ्याने केलेल्या अभ्यासाचे कार्यप्रदर्शन मोजण्याचे प्रमाण होय. हे त्या सेमेस्टरमध्ये विद्यार्थ्याने नोंदणी केलेल्या अभ्यासक्रमांमध्ये मिळवलेल्या एकूण क्रेडिट पॉइंट्सचा योग आणि त्या सेमेस्टरमध्ये घेतलेल्या एकूण क्रेडिट्सच्या योगाचे गुणोत्तर असते.SGPA दोन दशांशांपर्यंत (two decimal places) व्यक्त केला जातो.

(H) सेमेस्टर: प्रत्येक सेमेस्टरमध्ये १५ ते १८ आठवड्यांचे शैक्षणिक कार्य असते, जे ९० प्रत्यक्ष अध्यापन दिवसांइतके असते.

(I) ट्रान्सक्रिप्ट / ग्रेड कार्ड / प्रमाणपत्र: प्रत्येक सेमेस्टरनंतर नोंदणीकृत विद्यार्थ्यांना त्यांच्या मिळवलेल्या ग्रेड्सच्या आधारे ग्रेड प्रमाणपत्र (Grade Certificate) दिले जाते.या प्रमाणपत्रात अभ्यासक्रमाची माहिती (कोड , नाव, क्रेडिट्स, प्राप्त ग्रेड) आणि त्या सेमेस्टरचा SGPA व त्या सेमिस्टरपर्यंत मिळवलेला CGPA नमूद केलेला असतो.

(J) सर्व जनरल निवड अभ्यासक्रम (Generic Electives) हे सैद्धांतिक असतील: हे अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने शिकवले जातील. अशा अभ्यासक्रमांचे मूल्यांकन ऑनलाइन आणि ऑन-डिमांड पद्धतीने घेतले जाईल.

(K) विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील कामगिरीचे मूल्यांकन करताना: सत्रीय, मध्यम-कालीन व अंतिम सेमिस्टर परीक्षा अशा विविध टप्प्यांवर घेतलेल्या परीक्षांच्या आधारे संख्यात्मक गुण (Marks) दिले जातील. हे गुण योग्य लेटर ग्रेडमध्ये (Letter Grade) रूपांतरित केले जातील. गुणांमध्ये असणाऱ्या फरक टाळण्यासाठी UGC च्या शिफारशींचे पालन केले जाईल. क्रेडिट बेस्ड सेमेस्टर सिस्टमअंतर्गत खालील प्रणाली राबवली जाईल.

(L) ग्रेडिंग प्रणाली:

i. परीक्षार्थ्यांचे मूल्यांकन संबंधित अभ्यासक्रमासाठीच्या आंतरिक मूल्यांकन आणि अंतिम परीक्षेनुसार केले जाईल. सर्व गुण एकत्रित करून १० पॉइंट्स स्केलवर (Grade Point Scale) त्याचे प्रमाणबद्ध (Prorate) रूपांतरण केले जाईल. उदाहरणार्थ, जर एखाद्या विद्यार्थ्याने एकूण १०० गुणांपैकी ४६ गुण मिळवले, तर त्याला C (Average) ग्रेड व ५ ग्रेड पॉइंट्स मिळतील.

ii. ज्या विद्यार्थ्याला F ग्रेड मिळेल, त्याला नापास मानले जाईल व त्याला परीक्षा पुन्हा द्यावी लागेल.

iii. Non-credit अभ्यासक्रमांमध्ये लेटर ग्रेडच्या ऐवजी 'संतोषजनक' (Satisfactory) किंवा 'असंतोषजनक' (Unsatisfactory) असा उल्लेख केला जाईल. हे SGPA किंवा CGPA च्या गणनेत समाविष्ट केले जाणार नाहीत.

iv. पदव्याकरिता पात्रता ठरवताना , विद्यापीठे AICTE, MCI, BCI, NCTE यांसारख्या अधिकृत व्यावसायिक परिषदा दिलेल्या शिफारशींचा विचार करून पास होण्याकरिता आवश्यक ग्रेड, टक्केवारी किंवा CGPA निश्चित करू शकतात.

SGPA आणि CGPA चे संकलन (Computation of SGPA and CGPA),SGPA (Semester Grade Point Average) आणि CGPA (Cumulative Grade Point Average) मोजण्यासाठी खालील पद्धत वापरली जाते:

(i) SGPA मोजण्याची सूत्र पद्धत:

SGPA म्हणजे एखाद्या विद्यार्थ्याने एखाद्या सेमेस्टरमध्ये घेतलेल्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये मिळवलेल्या (क्रेडिट्स × ग्रेड पॉइंट्स) चा एकूण योग आणि त्या अभ्यासक्रमांचे एकूण क्रेडिट्स यांचे गुणोत्तर.

सूत्र:

$$SGPA\ (Si) = \sum(Ci \times Gi) / \sum Ci$$

जिथे:

- Ci = i व्या अभ्यासक्रमाचे क्रेडिट्स
- Gi = i व्या अभ्यासक्रमामध्ये मिळवलेला ग्रेड पॉइंट

उदाहरण: SGPA मोजण्याचे उदाहरण

अभ्यासक्रम	क्रेडिट्स (Ci)	ग्रेड	ग्रेड पॉइंट (Gi)	क्रेडिट पॉइंट (Ci × Gi)
Course 1	3	A	8	3 × 8 = 24
Course 2	4	B+	7	4 × 7 = 28
Course 3	3	B	6	3 × 6 = 18
Course 4	3	O	10	3 × 10 = 30

Course 5	3	C	5	3 × 5 = 15
Course 6	4	B	6	4 × 6 = 24

एकूण क्रेडिट्स = 20

एकूण क्रेडिट पॉइंट्स = 139

तर, SGPA = 139 / 20 = 6.95

अर्थात, विद्यार्थ्याचा SGPA = 6.95

CGPA चे उदाहरण (Illustration for CGPA) – मराठीत

(1) CGPA मोजण्याची पद्धत:

CGPA (Cumulative Grade Point Average) देखील SGPA प्रमाणेच मोजले जाते , पण ते संपूर्ण अभ्यासक्रमात विद्यार्थ्याने सर्व सेमिस्टर्समध्ये केलेल्या अभ्यासक्रमांच्या आधारे मोजले जाते.

सूत्र:

$$CGPA = \sum(Ci \times Si) / \sum Ci$$

जिथे:

- Si = i व्या सेमिस्टरचा SGPA
- Ci = i व्या सेमिस्टरमधील एकूण क्रेडिट्स

(2) SGPA आणि CGPA हे दोन्ही 2 दशांश स्थानी (decimal points) पर्यंत राऊंड करून ट्रान्सक्रिप्टवर दर्शविले जातील.

उदाहरण:

सेमिस्टर	क्रेडिट्स (Ci)	SGPA (Si)
Semester I	21	6.9
Semester II	22	7.8
Semester III	25	5.6
Semester IV	26	6.0
Semester V	26	6.3
Semester VI	26	8.0

म्हणून, CGPA = (21×6.9 + 22×7.8 + 25×5.6 + 26×6.0 + 26×6.3 + 26×8.0) ÷ (21+22+25+26+26+26)

CGPA = 6.78

(3) ट्रान्सक्रिप्ट (प्रमाणपत्राचा नमुना):

वरील ग्रेड्स , ग्रेड पॉइंट्स , SGPA आणि CGPA यावर आधारित , विद्यापीठ विद्यार्थ्याला प्रत्येक सेमिस्टरसाठी ट्रान्सक्रिप्ट (ग्रेड कार्ड) आणि सर्व सेमिस्टरचा एकत्रित ट्रान्सक्रिप्ट देईल.

(4) पदवी प्रदान (Award of Degree):

सर्व वर्षांतील अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यावर , पुढील पदवी समारंभात प्रत्यक्ष किंवा अनुपस्थितीत पदवी प्रदान केली जाईल.

७.शिक्षणक्रम शुल्क

७.१ बी.कॉम प्रथम वर्ष प्रथम वर्ष एकूण शिक्षणक्रम शुल्क रु.३३०८(तीन हजार तीनशे आठ रुपये मात्र) त्याची विगतवारी पुढीलप्रमाणे:

विद्यापीठ शुल्क **अभ्यासकेंद्र शुल्क**	**रु. 2753=00** **रु. 555=00**
एकूणशिक्षण क्रम शुल्क	रु. 3308=00

संवैधानिक शुल्क (Mandatory Fees)

अ.क्र.	शुल्काचे शीर्षक	शुल्क रु.
1	नोंदणी शुल्क	200-00
2	माहितीपुस्तिका शुल्क	50=00
3	पात्रता शुल्क	100=00
4	ओळखपत्र	10=00
5	ई-सुविधा / ई-सर्विसेस शुल्क	70=00
6	कुलपती ऑफीस इव्हेण्ट शुल्क	38=00
7	स्पोर्ट शुल्क	50=00
8	डी एसडब्लू शुल्क	50=00
9	आपत्ती व्यवस्थापन शुल्क	10=00
10	ग्रंथालय शुल्क	10=00
11	एन. एस. एस. शुल्क	10=00
12	संवाद शुल्क	10=00
13	विद्यार्थी विमा शुल्क	20=00
	एकुण शुल्क	628=00

ब) प्रथम वर्ष शुल्क

शिक्षण शुल्क (Tuition Fees) 1600=00
परीक्षा शुल्क 1080=00

संवैधानिक शुल्क	628= 00
एकूण शुल्क रुपये	3308-00

शुल्क भरण्यासंबंधी सूचना

विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावर कोणतेही शुल्क जमा करावयाचे नाही. एकूण शिक्षणक्रम शुल्क रु. 3308/- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करावयाचे आहे. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने रक्कम स्वीकारली जाणार नाही.

महत्त्वची सूचना :

1. विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार अंध व तृतीय पंथी विद्यार्थी तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचे पाल्य यांना नाममात्र नोंदणीशुल्क रु.200-/ भरून प्रवेश घेता येईल.
2. विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार संबंधित शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्ष तसेच तृतीय वर्षाचे शुल्क जाहीर करण्यात येईल.

पुनः परीक्षार्थीसाठी सूचना

जे विद्यार्थी एका किंवा अनेक विषयात अनुउत्तीर्ण / अनुउपास्थित राहिल्यास त्यांना पुढील सत्रांत पुन:परीक्षार्थी अर्ज व शुल्क भरून विषय उत्तीर्ण करता येतील. सदर शुल्क खालीलप्रमाणे:

अ.क्र	तपशील	शिक्षणक्रम शुल्क
१	प्रमाणपत्र/पदविका/पदवी (व्यावसायिक/तांत्रिक/सायन्स वगळून)	रु. १८० प्रती पेपर
२	पदव्युत्तर पदवी आणि सर्व शिक्षणक्रम पदवी व्यावसायिक/तांत्रिक/सायन्सचे सर्व शिक्षणक्रम लेखी परीक्षा	रु. २०० प्रती पेपर
३	प्रात्यक्षिक / मौखिक परीक्षा (viva-voce) प्रात्यक्षिक / स्टुडीओ वर्क / टर्म वर्क- प्रकल्प / मौखिक -	 रु .२२० रु. ३००
४	मार्कशीट शुल्क	रु. १००
५	विलंभ शुल्क	रु१००.
६	अतिविलंभ शुल्क	रु. ५००

सुचना : सदर परीक्षा पुनःपरीक्षा शुल्कात विद्यापीठाच्या निर्णयानुसार बदल होऊ शकतो.

८. Academic Bank of Credits ID तयार करण्याबाबतची सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नुसार आपणास 2020 Academic Bank of Credits ID तयार करणे अनिवार्य आहे .

आपणास Academic Bank of Credit ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेले प्रमाणपत्र, पदविका, पदवीची माहिती Digi Locker(ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडीट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits ID नोंदणी http://www.abc.gov.in या पोर्टलवर करता येईल किंवा आपल्या विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या बटनाला किल्क करा. यातील Academic Bank of Credits ID वर किल्क केल्यानंतर Academic Bank of Credits ID तयार करण्यासंबंधीत माहिती व PPT सादरीकरण आपणास वेबसाईटवर उपलब्ध केलेले आहे.

महत्वाची सूचना -1 : प्रथम वर्षाला प्रवेशीतझालेल्या सर्व विद्यार्थ्यांना छापील अध्ययन साहित्य परिक्षेपूर्वीच आपापल्या अभ्यास केंद्रावरून घेऊन जावे. निकाल जाहीर झाल्यानंतर अध्ययन साहित्य नेलेले नसल्यास त्यावर विद्यार्थ्याचा हक्क असणार नाही.

सूचना : २-यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेशघेणाऱ्या अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्ग (OBC), विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT), विशेष मागास प्रवर्ग (SBC) व आर्थिक दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातील घटकातील विद्यार्थ्यांना शासनाच्या/Post Matric Scholarship Schemes (शिष्यवृत्ती योजना) लागू आहेत. शिष्यवृत्ती संदर्भात सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर शिष्यवृत्ती **Tab** मध्ये दिली आहे.सदर माहिती काळजीपूर्वक वाचून प्रवेश अर्ज भरताना शिष्यवृत्ती पर्यायाची निवड करायची आहे.शिष्यवृत्ती पर्याय स्वीकारून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेताल्यानंतर शासनाच्या महाडीबीटी संकेतस्थळावरून ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरणे बंधनकारक आहे.

९.नोंदणी प्रक्रिया

1. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेप्रमाणे नोंदणी प्रक्रिया पूर्णकरावी.
2. ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मिळालेली पावती अभ्यासकेंद्रा वर दाखवून आपला प्रवेश निश्चित करावा.

१०.सायबर सुरक्षा अभ्यासक्रम (अनिवार्य ऑडीट कोर्स)

विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) संदर्भ D.O.No.F.2022/42-1(e.Gov)17th October,2022 (परिशिष्ट पहा) च्या निर्देशानुसार तसेच 28/05/2024 रोजी घेण्यात आलेल्या विद्वत परीषदेतील विषय 63.3.15.3 नुसार शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्राप्त करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने सायबर सुरक्षा अभ्यासक्रम लागू केला आहे. या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून केलेली आहे.

संरचना : सायबर सुरक्षा अभ्यासक्रम हा एक ऑडीट कोर्से असून त्यासाठी श्रेयांक नसले तरी तो शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणक्रमांना अनिवार्य करण्यात आला आहे. हा शिक्षणक्रम मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध आहे. मूळ शिक्षणक्रम पूर्ण करण्यापूर्वी सायबर सुरक्षा अभ्यासक्रम उतीर्ण करणे आवश्यक आहे. तो उतीर्ण केल्यानंतर त्याचे स्वतंत्र प्रमाणपत्र देण्यात येईल. **सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्त्यांना त्यांच्या मूळ शिक्षणक्रमाचे**

प्रमाणपत्र मिळेल. (प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रमांना हा अभ्यासक्रम लागू नाही)

कालावधी : हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा कालावधी पदवी स्तरावरील शिक्षणक्रमांना ०३ वर्ष (नियुक्त कालावधी) तर पदव्युत्तर शिक्षणक्रमांना ०२ वर्ष (B.Lib. & M.Lib.&I.Sc) एक वर्षाचा असेल त्यांना हा अभ्यासक्रम ०१वर्षात पूर्ण करावा लागेल. तसेच B.C.A. सारख्या शिक्षणक्रमास दुसऱ्या वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ०२ वर्षात पूर्ण करावा लागेल.

शुल्क : सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाचे शुल्क रु.५०० आहे. एकदा शुल्क भरल्यानंतर विद्यार्थ्याकडून सदर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत त्यांच्याकडून कुठलेही शुल्क घेतले जाणार नाही. **(विद्यार्थ्याने प्रवेश केलेल्या मूळ शिक्षणक्रमाच्या व्यतिरिक्त हे शुल्क आहे.)**

नोंदणी : सदर अभ्यासक्रमाला नोंदणी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश खाली दिलेल्या लिंकचा उपयोग करून ॲप डाऊनलोड करावा व आवश्यक ती माहिती भरून अभ्यासक्रमाचे शुल्क भरावे . **(ॲप डाउनलोड करण्यासाठी विद्यापीठाने खाली दिलेल्या लिंकचा वापर करावा.)**

Sr. No.	Mobile O.S.	Link
1	Android	https://play.google.com/store/apps/details?id=org.mkcl.ycmoudu
2	IOS	https://apps.apple.com/in/app/устои-student/id6475083272

अध्ययन पद्धती : सायबर सुरक्षा अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीचा MOOC (Massive Open Online Course) Yashex या ऑनलाईन प्लॅटफॉर्म (online platform) (https://yashex.mkcl.org/#/) वर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे . सर्व अध्ययन साहित्य, व्हिडीओ व्याखाने आणि मुल्यांकन, ऑनलाईन उपलब्ध आहे. हा स्व-अभ्यासक्रम आहे. त्यामुळे विद्यार्थी आपल्या सोयीप्रमाणे शिकू शकतात. त्यासाठी विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी वरील दिलेल्या YCMOU Student App मोबाईल Application वर नोंदणी केल्यानंतर लॉगीन आयडी (Login ID) व पासवर्ड (Password) विद्यार्थ्यांना ईमेल (Email) व लघु संदेश (SMS) द्व्यारे पाठविण्यात येईल. विद्यार्थ्याने सदर अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने पूर्ण करावा.

मूल्यमापन : सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने Yashex या ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारा अभ्यासक्रम पूर्ण आल्यानंतर देता येईल.

परीक्षेचे स्वरूप : परीक्षा ही ऑनलाईन MCQ (Multiple Choice Question) स्वरूपाची असेल.

सूचना : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ(YCMOU) लवकरच विद्यार्थ्याना platform वापरणे, अभ्यास साहित्याचा वापर करणे आणि परीक्षा कशी द्यायची याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी एक सदरीकर्ण (Persentation) विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येईल.

११. C127-IBM Certificate program in Generative AI & Prompt Engineering- Commerce

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_sol@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191

स्कूल ऑफ डिजीटल एज्युकेशन / School of Digital Education

SODE/2025/ Date: 14/06/2025

C127-IBM Certificate program in Generative AI& Prompt Engineering- Commerce

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बी.ए., बी.कॉम. व इतर शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता वाढावी यासाठी मुक्त विद्यापीठाने**'C127 -IBM Certificate program in Generative AI & Prompt Engineering- B. Commerce'**हा प्रमाणपत्र शिक्षणक्रम पदवी शिक्षणक्रमा बरोबरच करण्याची संधीविद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली आहे.

अभ्यासक्रमाची संरचना:

'C127-IBM Certificate program in Generative AI & Prompt Engineering- B.Commerce' अभ्यासक्रमहाएकअॅड-ऑनकोर्स असून त्यासाठी 2 श्रेयांकआहेत. हा अभ्यासक्रम विद्यापीठाने च्या **ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरमराठी**भाषेमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे.विद्यार्थ्यांनीहाअभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्याचे स्वतंत्रप्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच ह्या अभ्यासक्रमाअंतर्गत विद्यार्थीजनरेटिव्ह AI, प्रॉम्प्ट डिझाइन, डेटा विश्लेषण, स्वयंचलन (automation) आणि व्यावसायिक संवाद कौशल्येयांसारखीरोजगारक्षम कौशल्येआत्मसात करू शकतात. ही कौशल्ये त्यांनावित्तीय विश्लेषक, अकाउंटिंग ऑटोमेशन स्पेशालिस्ट, ग्राहक संवाद व्यवस्थापक आणि डिजिटल बिझनेस प्रोफेशनलअशा भूमिकांसाठी सक्षम करतात.

अधिक माहिती:

नोंदणी कालावधी	वर्षभर सुरू
श्रेयांक	2
अभ्यासक्रमाची एकूण वेळ	६० तास
अभ्यास पद्धत	Online- **स्वयंगतीने, स्वयं-अभ्यासाच्या स्वरूपात** (ई-ट्युटोरियलव्हिडिओ, वाचनसाहित्य, स्वयंमूल्यांकनवप्रात्यक्षिकप्रकल्पांचासमावेशअभ्यासक्रमातआहे.)
भाषा	मराठी
प्रमाणपत्र	IBM मार्फत (हे प्रमाणपत्र IBM आणियशस्वी संस्थायांनी प्रमाणित केलेलेअसून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) कडून मान्यता प्राप्त आहे.)
प्रमाणपत्र स्वरूप	डिजिटल
अभ्यासक्रम पूर्ण करण्याची कमाल मुदत	विद्यार्थ्यांचे अकाउंट सक्रीय झाल्यापासून ६ महिने / १८० दिवस
शुल्क	एकूण शुल्क 1290/-(**सदरचे शुल्क प्रवेश घेतलेल्या मूळ शिक्षणक्रमाच्याव्यतिरिक्त असेल.**)
ऑनलाईन प्लॅटफॉर्म	https://yashex.mkcl.org/#/
विद्यार्थ्यांचा लॉगिन आयडी	IBM अभ्यासक्रमासाठी YCMOU कडून दिलेले PRN हेच लॉगिन आयडी असेल
पासवर्ड	यशस्वी संस्थेकडून, YCMOU कडून फी प्राप्त झाल्यानंतर प्रदान केला जाईल.
नोंदणी/ प्रवेश	मुक्तविद्यापीठाच्या online प्रवेश पोर्टलवरून प्रवेश घेता येईल.- https://admitlivestg.mkcl.org/applicant/#/login?client=YCMOU
मूल्यमापन:	सदरशिक्षणक्रमासाठीकोणतीही अंतिमपरीक्षा नसूनप्रत्येकमॉड्यूलनंतर सातत्यपूर्ण अंतर्गत मूल्यमापन असेल.

इमरटस प्रोफेसर कविता साळुंके संचालक, स्कूल ऑफ डिजिटलएज्युकेशन

पाठ्यक्रम

पाठ क्रमांक	पाठाचे शीर्षक	मुख्य मुद्दे
१	जनरेटिव्ह AI ची ओळख	संकल्पना, उपयोग, GAIL (Generative Adversarial Imitation Learning), मॉडेल मूल्यमापन, नैतिकता
२	प्रॉम्प्ट अभियांत्रिकीचे मूलतत्त्व	प्रॉम्प्टचे प्रकार, माध्यमानुसार डिझाइन, human-in-the-loop, explainability
३	प्रभावी प्रॉम्प्ट डिझाइन करणे	स्पष्टता, वैयक्तिकरण, few-shot/zero-shot learning, बहुभाषिक प्रॉम्प्ट
४	संवादात्मक प्रॉम्प्ट व वापरकर्ता सहभाग	UX (User Experience), दृश्य/मौखिक प्रॉम्प्ट, अभिप्राय, reinforcement learning
५	Excel मध्ये जनरेटिव्ह AI चा वापर	सूत्रांसाठी प्रॉम्प्ट, चार्ट्स, automation, डेटा सादरीकरण
